सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०**

# महाराष्ट्र औद्योगिक संबंध (विवक्षित कार्यवाह्यांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९७२

( १५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. X of 1973**

# The Maharashtra Industrial Relation to (Validation of Certain Proceedings) Act, 1972

*(As modified upto the 15th October, 2012)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांनी मुद्रित केले व संचालक, शासन मुद्रण व प्रकाशने लेखनसामग्री, व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१३

[किंमत रु.      ]

## महाराष्ट्र औद्योगिक संबंध (विवक्षित कार्यवाह्यांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९७२

## (सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०)

## अनुक्रमणिका

**उद्देशिका**


| **कलमे** | | **पृष्ठ** |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव. .. .. .. | १ |
| २. | कलम ४२ ची तात्पुरती सुधारणा आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम अकरा; याच्या विवक्षित उपबंधाखाली कामगार न्यायालयांमध्ये व औद्योगिक न्यायालयांत दाखल केलेल्या कार्यवाह्यांची विधिग्राह्यता व त्या निकालात काढणे. .. .. | २ |

## सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०[१]

**[ महाराष्ट्र औद्योगिक संबंध (विवक्षित कार्यवाह्यांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९७२ ]**

**[ २० फेब्रुवारी, १९७३ ]**

**मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम-१९४६, याच्या विवक्षित उपबंधान्वये कामगार न्यायालयांमध्ये अथवा औद्योगिक न्यायालयांमध्ये सुरु झालेल्या विवक्षित कार्यवाह्या विधिग्राह्य करण्यासाठी व विवक्षित कार्यवाह्या पुन्हा सुरु करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** मुंबई उच्च न्यायालयाने (नागपूर न्यायमंडळ), १२ एप्रिल, १९६७ रोजी निर्णय दिलेल्या १९६६ च्या ८१२ क्रमांकाच्या विशेष दिवाणी अर्जात—

" ............................ मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ याचे कलम ७८, पोट-कलम (१) च्या परिच्छेद (ड) अन्वये अधिकार ठरविताना, एखाद्या कर्मचाऱ्याला प्रथम मालकाकडे जाण्याची किंवा त्या अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४), आणि त्याच्या परंतुकाखालील कार्यपद्धती अनुसरण्याची आवश्यकता नाही" असा निर्णय दिला आणि विनंतीअर्ज खर्चासहित फेटाळला. (या अधिनियमात यापुढे या निर्णयाचा "उच्च न्यायालयाचा निर्णय" असा निर्देश केला आहे) ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या सर्वोच्च. न्यायालयाने १९६८ च्या दिवाणी अपील क्रमांक १२ मध्ये दिनांक ९ मार्च, १९७२ रोजी म्हणजे जवळजवळ पाच वर्षानंतर निर्णय देऊन विरुद्ध मत दिले आहे आणि उच्च न्यायालयाचा निर्णय अधिशून्य केला आहे (१९७२ च्या लेबर लॉ जर्नल ६५७ चा खंड एक पहा) (या अधिनियमात यापुढे या निर्णयाचा "सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय" असा निर्देश केला आहे) ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १२ एप्रिल, १९६७ रोजी (म्हणजे "उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या" तारखेला, सुरु होणाऱ्या व ९ मार्च, १९७२ रोजी (म्हणजेच "सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या" तारखेला, संपणाऱ्या कालावधीत (या अधिनियमात यापुढे " संबद्ध कालावधी" असा ज्याचा निर्देश केला आहे) [मुख्य अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४) आणि त्याचे परंतुक याअन्वये विहित केलेली कार्यपद्धती न अनुसरता] मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून, मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ चे कलम ७८, पोट-कलम (१) च्या परिच्छेद (ड) अन्वये, सुरु झालेल्या कितीतरी कार्यवाह्या, एक तर कामगार न्यायालयात किंवा अपिलाच्या स्वरुपात औद्योगिक न्यायालयात प्रलंबित राहिल्या आहेत ;

१९४७ चा मुंबई ११.

**आणि ज्याअर्थी,** कलम ७८, पोट-कलम (१) परिच्छेद (ड) खालील कार्यवाही मुख्य अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४) आणि त्याचे परंतुक याद्वारे विहित केलेली कार्यपद्धती न अनुसरता सुरु करण्यात आली होती याच केवळ कारणावरुन कामगार न्यायालयामध्ये आणि औद्योगिक न्यायालयात प्रलंबित असलेल्या कितीतरी कार्यवाह्या खारीज करण्यात आल्या आणि अशा न्यायालयांमध्ये प्रलंबित आहेत अशा कितीतरी कार्यवाह्या त्याच कारणावरुन खारीज होण्याचा संभव आहे आणि कार्यवाही अशारीतीने खारीज होण्यामुळे उच्च न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून अशा कार्यवाह्या दाखल केलेल्या पक्षकारांचे अकारण नुकसान झाले आहे आणि होण्याचा संभव आहे ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा. महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७२, भाग पाच इं. पृ. ६६५.

**आणि ज्याअर्थी,** कामगार न्यायालयांमध्ये किंवा औद्योगिक न्यायालयात प्रलंबित असलेल्या अशा सर्व कार्यवाह्या वैधरीत्या सुरु झाल्याचे मानले जाणे आणि मुख्य अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४) किंवा त्याचे परंतुक याद्वारे विहित केलेली कार्यपद्धती न अनुसरता अशा कार्यवाह्या करण्यात आल्या याच केवळ कारणावरुन, अशा कार्यवाह्या खारीज करण्यात आल्या असतील त्याबाबतीत, अशा कार्यवाह्या पुन्हा सुरु करणे पक्षकारांना शक्य व्हावे यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र औद्यौगिक संबंध (विवक्षित कार्यवाह्यांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९७२, असे म्हणता येईल.

कलम ४२ ची तात्पुरती सुधारणा आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम अकरा ; यांच्या विवक्षित उपबंधा खाली कामगार न्यायालयांमध्ये व औद्योगिक न्यायालयांत दाखल केलेल्या कार्यवाह्यांची विधिग्राह्यता व त्या निकालात काढणे.

१९७२ चा महा १०.

**२.** (१) संबद्ध कालावधीत, मुख्य अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४) चे उपबंध वगळण्यात आल्याचे समजण्यात येईल ; आणि तद्नुसार, संबंध कालावधीत सुरू केलेल्या आणि महाराष्ट्र औद्योगिक संबंध विधिग्राह्यता (विवक्षित कार्यवाह्यांची विधिग्राह्यता) अधिनियम, १९७२, याच्या प्रारंभाच्या वेळी, कोणत्याही कामगार न्यायालयात किंवा ज्याच्याकडे अपील केले असेल अशा औद्यौगिक न्यायालयात, प्रलंबित असलेल्या, कोणत्याही कार्यवाह्या अशा कामगार न्यायालयामध्ये यथोचितरीत्या व वैधरीत्या सुरू करण्यात आल्या असल्याचे किंवा यथास्थिति, औद्योगिक न्यायालयात चालू असल्याचे मानण्यात येईल. आणि मुख्य अधिनियमांचे कलम ७८, पोट-कलम (१), परिच्छेद (ड) खालील कार्यवाही मुख्य अधिनियमान्वये कलम ४२, पोट-कलम (४) आणि त्याचे परंतुक याद्वारे विहित केलेली कार्यपद्धती न अनुसरता सुरु करण्यांत आली आहे याच केवळ कारणावरुन, अशी कोणतीही कार्यवाही किंवा अपील खारीज करता येणार नाही किंवा रद्द करता येणार नाही ;

(२) मुख्य अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४) आणि त्याचे परंतुक याद्वारे विहित केलेली कार्यपद्धती न अनुसरता, मुख्य अधिनियमाचे कलम ७८, पोट-कलम (१), परिच्छेद (ड) खाली कार्यवाही सुरु करण्यात आली याच केवळ कारणावरुन, कोणत्याही कामगार न्यायालयाने किंवा औद्योगिक न्यायालयाने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, अशी कोणतीही कार्यवाही खारीज केली असेल त्याबाबतीत, अशा कार्यवाहीचे या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या मुदतीच्या आत त्याकरिता अर्ज केल्यावर कामगार न्यायालयाच्या किंवा औद्योगिक न्यायालयाच्या फाईलवर पुन:स्थापन करता येईल आणि संबंध कालावधीत मुख्य अधिनियमाचे कलम ४२, पोट-कलम (४) चे परंतुक वगळण्यात आले आहे असे समजून त्यावर निर्णय देता येईल.

---

एच ७६४-६,०५०-२-२०१३

**शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर**

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
महाराष्ट्र राज्य
(प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
पुणे-४११ ००१
दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**

शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
औरंगाबाद-४३१ ००१
दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते